# Managing Committee Minute Book
## कार्यकारी मंडळाचे मिनिट बुक

Meeting No. 01 -2022-2027

Date तारीख 26-06-2022

| Resolution No. ठराव नं. | Present Members & Resolution हजर सभासद व ठराव | Remarks शेरा |
| --- | --- | --- |
| | कार्यकारी मंडळाच्या पहिल्या सभेचे इतिवृत्त | |
| | ओशिवरा रिध्दी सिध्दी स.गृ.स (म) च्या प्रति. नव निर्वाचित पहिल्या व्यवस्थापक समितीची व मावळत्या समितीची पहिली सभा आज रविवार दिनांक २६-०६-२०२२ रोजी संस्थेच्या कार्यालयात या सभेचे दि. २२-०६-२०२२ रोजी सदस्याना दिलेल्या सूचनापत्रानुसार घेण्यात येत आहे. सदर सभेस खाली सह्या करणारे सर्व सदस्य उपस्थित आहेत. | |
| | सदर सभेमध्ये सूचनापत्रावर दिलेल्या विषयांवर चर्चा करून निर्णय घेण्यात आले. | |
| | सभेला उपस्थित असलेले सदस्य | |
| | १) मधुसुदन रुकमाजी भालेकर | |
| | २) कबिर अहमद अन्सारी | |
| | ३) रमेश गणपत सुर्वे | |
| | ४) लिलाधर घनश्याम पाटील | |
| | ५) पांडुरंग वामन ठाकूर | |
| | ६) बदुद्दीन खैरुद्दीन शेख | |
| | ७) मंजू आत्माराम पिरवानी | |
| | ८) सुमन सिंग | |
| | ९) Tarun Chhabra. | |
| | वरिल सर्व सदस्य उपस्थित झाल्यानंतर सचिवांनी अध्यक्षांच्या परवानगीने सभेच्या कामकाजास सुरवात | |
| विषय क्र. १ | मागिल सभेचे इतिवृत्त वाचून दाखविणे | |
| | याबाबत माहिती देताना अध्यक्षांनी असे सांगि- | |

# Managing Committee Minute Book
## कार्यकारी मंडळाचे मिनिट बुक



Meeting No. सभा नं. 01-2022-27 | Date तारीख 26.06.22

| Resolution No. ठराव नं. | Present Members & Resolution हजर सभासद व ठराव | Remarks शेरा |
|---|---|---|
| | सले कि, आपल्या संस्थेची व्यवस्थापक समितिची निवडणूक दिनांक १२ जून रोजी होवून आपली नविन व्यवस्थापक समिति निवडून आलेली आहे त्यानंतर दि०१९-०६-२०२२ रोजी नवनिर्वाचित सदस्यांची सभा संस्थेचे निवडणूक अधिकारी श्री संजय वाडज यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली असून आपल्या सर्वांच्या एकमताने संस्थेचे अध्यक्ष, सचिव व खजिनदार यांची निवड झालेली आहे. सदर सभेच्या इतिवृत्ताचे वाचन करण्यास सचिवांना सांगण्यात आले. त्याप्रमाणे सचिवांनी इतिवृत्ताचे वाचन केले. त्यानंतर अध्यक्षांनी सर्वांना असे आव्हाहन केले कि, यापुढील पाच वर्षे आपण संस्थेच्या सर्व सभासदांचे हित लक्षात घेवून त्याप्रमाणे संस्थेच्या उपविधितील नितिनियमांचे पालन करुन व आगामी काळात मुख्य त्वे संस्थेच्या पूर्नविकासाच्या कामावर लक्ष केंद्रित करुन लवकरात लवकर संस्थेवर विकासकाची नेमणूक करुन संस्थेच्या सर्व सभासदांना त्यांचे अपेक्षाप्रमाणे घर वेळेवर मिळेल यासाठी सर्वांना बरोबर घेवून काम करावे लागेल त्यासाठी सर्वांनी मिळून एकत्रितपणे काम करुया व हि सभा आटोपल्यावर संस्थेमधील आपल्या विरोधात जो गट निवडणूकीच्या रिंगणात उतरलेला होता त्या सर्वांना बोलावून त्यांना यापुढे संस्थेच्या सर्व कामात सहकार्य करण्याचे आव्हाहन करुया असे सांगितले व यास सर्वांनी मान्यता दिली. त्यानंतर पुढील विषय घेण्यात आला. | |
| | विषय क्रं. २ संस्थेचे दप्तर मावळत्या समितिकडून नवनिर्वाचित समितिकडे हस्तांतरित करणे बाबत — | |

आशावरी रिध्दी सिध्दी स.गृ.सं. नोंदणी क्र. मु./म्हाडा/गृ/(टी.सी.)/१३०६१/२०११-१२ ... नगर, मुंबई ४०००..

# Managing Committee Minute Book
# कार्यकारी मंडळाचे मिनिट बुक



**Date** तारीख 26/06/2022

**Meeting No.** सभा नं. 01 - 2022to27

| Resolution No. ठराव नं. | Present Members & Resolution हजर सभासद व ठराव | Remarks शेरा |
| --- | --- | --- |

याविषयी भाष्य करताना अध्यक्षांनी उपविधितील तर-
तुदिप्रमाणे ज्यावेळी एकाद्या सहकारी संस्थेची निवडणूक होवू
न नविन समिति घटीत होते त्यावेळी जुन्या समितिचे
पदाधिकारी व नविन समितिचे पदाधिकारी यांची एकत्रित
पणे सभा घेवून त्यामध्ये जुन्या समितिचे अध्यक्ष
संस्थेचे सर्व दप्तर नविन समितिच्या अध्यक्षांना
हस्तांतरित केले जाते. त्याप्रमाणे आज आपण संस्थेचे
सर्व दप्तर जुन्या समितीकडून नविन समितिकडे
हस्तांतरित करण्या व तसा ठराव पारित करण्या व
त्याप्रमाणे सर्व दप्तर हस्तांतरित करण्यात आले.

ठराव : "आज ओशिवरा रिध्दी सिध्दी सहकारी गृहनिर्माण
ठराव क्र. १ संस्था (म)-ची मावळत्या समितिचे अध्यक्ष हे
2022-27 संस्थेच्या नवनिर्वाचित अध्यक्षांकडे संस्थेचे
त्यांच्या ताब्यात असलेले सर्व दप्तर उपविधितील
नियमाप्रमाणे आवश्यक ते सर्व कागदपत्र हस्ता-
तरित करत आहेत व त्यांचा ताबा नविन
समिति घेत आहे"

सूचक : रमेश गणपत सुर्वे
अनुमोदक : पांडुरंग वामण ठाकुर
ठराव सर्वानुमते संमत

विषय क्र. २. सदस्याकडून आलेल्या पत्रव्यवहारावर चर्चा
करुन निर्णय घेणेबाबत —

सदर विषयी सदस्यांना माहिती देताना सचिवांनी सर्वांना
अशी माहिती दिली कि, संस्थेच्या निवडणूकीसाठी ठरलेल्या
वेळापत्रकामध्ये संस्थेचे एक सदस्य श्री दाजी कृष्णा
शिर्सेकर यांचे निवडणूकीच्या कालावधिमध्ये अचानकपणे

ओशिवरा रिध्दी सिध्दी स.गृ.सं.म.
नोंदणी क्र. मुं/म्हाडा/गृ/(टी.सी.)/१३०६६/२०११-१३
... नगर, मुंबई

# Managing Committee Minute Book
## कार्यकारी मंडळाचे मिनिट बुक

Meeting No. / सभा नं. ०१ – 2022-027

Date / तारीख 26/06/2022

| Resolution No. / ठराव नं. | Present Members & Resolution / हजर सभासद व ठराव | Remarks / शेरा |
|---|---|---|
| | निधन झाल्यामुळे निवडणूकीचा कार्यक्रम लावला गेला परिणामी संस्थेच्या रहिवाशी सभासदाकडून आलेल्या अर्ज विनंतीवर निर्णय घेता आलेला नाही त्यामुळे या सभेमध्ये त्या सर्व पत्रव्यवहारवर निर्णय घेणे आवश्यक आहे व सचिवांना त्या सर्व पत्रांचे एक-एक करुन वाचन करुन निर्णय घेणेबाबत सूचवले त्याप्रमाणे सचिवांनी पत्रांचे वाचन केले. | |
| | पत्र. क्र. १ – संस्थेमधिल सदनिका क्र. ८२४ हि सोपान सुखदेव खुळे यांचे नावावरुन श्रीमति कौशल्या अनिल लाड यांचे नावे करण्याबाबत — | |
| | सदर बाबतीत कागदपत्रांची पुर्तता झालेली असल्यामुळे श्रीमति कौशल्या अनिल लाड याना संस्थेचे सदस्य बनविण्यात आल्याचे मंजुर करण्यात आले व त्याना त्याप्रमाणे पत्र देण्याचे ठरले. | |
| | पत्र क्र. 2 : श्रीमती भावना अनिल मोठे व अनिल मोठे यांचेकडून त्यांनी सदनिका क्र. E १०८ हि नावे करुन त्याना संस्थेचे सदस्य बनविण्या बाबत संस्थेला पाठविलेले पत्र — | |
| | सदर बाबतीत सचिवांनी सदरची सदनिका मुळ सदनिकाधारकाकडून नविन सदनिका धारक म्हणून श्रीमती भावना अनिल मोठे व अनिल मोठे यांचे नावे संयुक्तीकपणे म्हणुने त्यांचे नावे करुन संस्थेला कळविलेले आहे व नविन सदस्यांनी सर्व कागदपत्रांची पूर्तता केली असल्यामुळे सदरची सदनिका क्र. १०८ हि श्रीमती भावना व अनिल मोठे यांचे नावे करण्यास आजची सभा मंजुरी देत आहे. मान. सचिवांनी सभेला सांगितले कि सदर सदनिकेवर सदनिका धारक | |

अंबिका रिध्दी सिध्दी … नोंदणी क्र. मु./म्हाडा/(टी सी)/१३०६६/२०११-१२ … नगर, मुंबई-४००…

# Managing Committee Minute Book
## कार्यकारी मंडळाचे मिनिट बुक

Meeting No. / सभा नं. 01 - 2022-27

Date / तारीख 26-06-2022

| Resolution No. / ठराव नं. | Present Members & Resolution / हजर सभासद व ठराव | Remarks / शेरा |
|---|---|---|
| | कारण सारस्वत सहकारी बँक (म) मुंबई यांचेकडून कर्ज घेतलेले असल्यामुळे व संस्थेने त्यांना हरकत पत्र दिल्यामुळे भागपत्रामध्ये या दोघांच्या नावासहित बँकेचे नाव दाखल करणे आवश्यक आहे त्याप्रमाणे तसे नमुद करुन त्यांना संस्थेचे बनविण्यात यावे व त्याप्रमाणे त्यांना पत्र देण्यात यावे असे ठरले त्यास सर्वांनी संमती दिली. | |
| | पत्र क्र. ३ :- सदनिका क्र. ९५८ श्रीमती मिनु अरोरा यांनी ~~संस्थेमधील~~ मुळ सदनिका धारकाकडून विकत घेवून म्हाडाचे दप्तरी नियमित करुन संस्थेचे सदस्य बनविण्यासाठी संस्थेकडे आलेला अर्ज — | |
| | याबाबत असे निदर्शनास आणण्यात आले की संस्थेमधील सदनिका क्र. ९५८ ही श्रीमती प्रेरणा विनायक व विनायक सहदेव गावडे यांचे नावावरुन म्हाडाचे दप्तरी श्रीमती मिनु अरोरा यांचे नावे रितसर झाली असल्यामुळे व संस्थेच्या सर्व कागदपत्रांची पूर्तता करत असल्यामुळे सदरची सदनिका त्यांचे नावे करण्यासाठीचा प्रस्ताव मंजूर करण्यात आला व तसे पत्र त्यांना देणेबाबतचे निर्देश सचिवांना देण्यात आले. | |
| | पत्र क्र. ४ — श्री सतिश आया पैगळ सदनिका क्र. ९९८ यांचेकडून आलेले पत्र वडिलांच्या नावावरुन मुलाच्या नावे सदनिका म्हाडाचे दप्तरी नियमित झाल्यामुळे मुलाला सदस्य बनविणे बाबत — | |

# Managing Committee Minute Book
## कार्यकारी मंडळाचे मिनिट बुक



**Meeting No.** सभा नं. 01-2022-27

**Date** तारीख 26-06-2022

| Resolution No. ठराव नं. | Present Members & Resolution हजर सभासद व ठराव | Remarks शेरा |
| --- | --- | --- |

सदर बाबतीत असा निर्णय घेण्यात आला कि, सदर बाबतीत योग्य त्या कागदपत्रांची पूर्तता करुन त्यांना लवकरात लवकर सदस्य बनविण्यात यावे.

प्रश्न क्र ३ : सदनिका क्र.१००२ हि दत्ताराम शंकर बाने यांचे निधन झाल्यामुळे ती त्यांचे पत्निच्या नावे करण्यास संस्थेकडून ना हरकत पत्र देणेबाबत.

याबाबत सचिवांनी असे सांगितले कि, याबाबत त्यांना अगोदरच ना हरकत पत्र देण्यात आलेले आहे व ती सदनिका म्हाडाचे दप्तरी त्यांचे नावे करण्याबाबतची कार्यवाही सुरु आहे.

त्याचप्रमाणे सचिवांनी सभेला असे सांगितले कि, संस्थेमधील सदनिका क्र.९०२, सदनिका क्र.९०१ या दोन्ही सदनिका धारकांच्या सदनिका म्हाडाचे दप्तरी त्यांचे नावे नियमित असल्यामुळे त्यांना संस्थेकडून विनंती करुन संस्थेचे सदस्य बनण्याबाबत विनंती करण्यात यावी.

तसेच अजुनहि काही सदस्य संस्थेचे सदस्य बनण्यास योग्य असतील तर त्यांना पत्राद्वारे विनंती करुन कागदपत्रांची पूर्तता करण्या संदर्भात सांगावे असे करुन संस्थेच्या पुनर्विकासामध्ये अडचणी येणार नाहि.

येवढे सांगून सदरचा विषय संपविण्यात आला.

विषय क्र. ४ : संस्थेचे बँक खाते उघडणे व चालविणे करिता नवनिर्वाचित सदस्यांना अधिकार बहाल करण्याचा ठराव पारित करणेबाबत

ओशिवरा रिध्दी सिध्दी स.गृ.सं.(म.) नोंदणी क्र. मु./म्हाडा/गृ/(टी.सी.)/१३०६६/२०११-१२ आदर्श नगर, मुंबई-४००१०२

# Managing Committee Minute Book
# कार्यकारी मंडळाचे मिनिट बुक



Meeting No. सभा नं. 01 - 2022 to 27

Date तारीख 26/06/2022

| Resolution No. ठराव नं. | Present Members & Resolution हजर सभासद व ठराव | Remarks शेरा |
|---|---|---|
| | सदर विषयावर माहिती देताना सचिवांनी असे सांगितले कि, संस्थेचे बचत खाते सहकारी संस्थाच्या नियमाप्रमाणे महाराष्ट्र जिल्हा मध्य मुंबई जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेत असणे आवश्यक आहे व त्याच्यातिरिक्त अन्य कोणत्याहि बँकेत संस्थेचे खाते उघडू शकते मात्र यासाठी संस्थेच्या सर्वसाधारण सभेची मान्यता घेणे आवश्यक आहे. सध्या तरि संस्थेचे खाते ज्या बँकेत आहे त्याच बँकेत राहुदे मात्र नव्याने निवडून आलेल्या पदाधिकाऱ्यांना खाते चालविण्याचे अधिकार नव्याने द्यावे लागतील व तसा ठराव पारित करुन बँकेला देणे आवश्यक आहे. त्याप्रमाणे संस्थेचे बँक खाते चालविण्याचे अधिकार पूर्वीप्रमाणेच संस्थेचे अध्यक्ष सचिव व खजिनदार यांना संयुक्तीक पणे देण्याचे ठरले. मात्र धनादेश अथवा पैश्याच्या कोणतेहि व्यवहार करण्याकरिता संस्थेकडून संस्थेचे सचिवांची सहि असलिच पाहिजे मात्र अध्यक्ष व खजिनदार या दोघांचीहि सहि असेल तर चालेल परंतु सचिवांच्या सहिसोबत ईतर अध्यक्ष व खजिनदार या दोघामधून एकाचि सहि असेल तरि चालेल असा ठराव घेण्यात यावा असे ठरले व त्याप्रमाणे बँकेत जावून आवश्यक त्या सर्व कागदपत्रांची पूर्तता करुन संस्थेच्या मुंबई जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या अंधेरी (प) शाखेत जावून सोपस्कार पूर्ण करण्याचे आदेश अध्यक्षांनी दिले त्याप्रमाणे ठराव घेण्यात आला | |
| ठराव क्र. 2 2022-27 | ठराव — अंधेरी रिद्धी सिद्धी सहकारी गृहनिर्माण संस्थेचे अगोदर पासून असलेले बचत खाते क्र. ०९४७००६००५४४७ हे आहे ते त्याच शाखेमध्ये तसेच ठेवावे मात्र सदर खाते | |

अंधेरी रिद्धी सिद्धी स.गृ.सं.(म.)

Meeting No. सभा नं. 01 - 2022-27

Date तारीख 26/06/2022

| Resolution No. ठराव नं. | Present Members & Resolution हजर सभासद व ठराव | Remarks शेरा |
|---|---|---|
| | चालविण्याचे पूर्ण अधिकार संस्थेचे अध्यक्ष श्रीमधु-सुदन रुकमाजी भोलेकर, सचिव कबिर अहमद अन्सारि व खजिनदार म्हणून श्री रमेश गणपत सुर्वे याना एकत्रितपणे देण्यात येत आहेत. मात्र ठरावामध्ये आसेहि ठरले आहे कि, पैश्याची देवान घेवान करत असताना संस्थेच्या नावाचे धनादेश अथवा इतर कोणतेहि दस्तऐवज बनवत असताना संस्थेच्या सचिवाची सहि हि असलीच पाहिजे सोबत अध्यक्ष व न खजिनदार या दोघांचिहि सहि असेल तर चालेल मात्र या दोघांमधून एकाचि जरि सहि असेल तरि ते दस्तऐवज चालू शकतील" | |
| | सूचक: श्री पांडुरंग वामण ठाकुर<br>अनुमोदक: श्रीमति मंजू आत्माराम पिरवानी<br>ठराव सर्वानुमते संमत | |
| | विषय क्र. ५ : मा० उपनिबंधक तसेच संस्थेचे कायदेशिर सल्लागार, प्रकल्प सल्लागार याना संस्थेच्या निवडणूकी बाबत कळवून नवनिर्वाचित सदस्यांच्या नावाची यादि पत्राद्वारे त्याचे माहितीसाठी त्याना कळविणेबाबत— | |
| | सदर विषयाबाबत असे ठरविण्यात आले कि, संस्थेच्या वतीने नवनिर्वाचित सर्व सदस्यांची नावे संस्थेचे कायदे-सल्लागार मे सावईकर व लभेरे याना संस्थेचे प्रकल्प सल्लागार मे० शिल्प असोसिएट तसेच मा० उपनिबंधक म्हाडा व मुंबई डिस्ट्रीक को० ऑ० हौसिंग फेडरेशन याना कळविण्यात | |

(Stamp: आंगिवरा सिध्दी सिध्दी ... नोंदणी क्र. मु/म्हाडा/प (टी.सी.)/१२१२ १३०६४/ २०११ आदर्श नगर, मुंबई-४००...; signatures in margin)

# Managing Committee Minute Book
# कार्यकारी मंडळाचे मिनिट बुक

**Meeting No.** सभा नं. ०१ - २०२२-२७ **Date** तारीख २६/०६/२०२२

| Resolution No. ठराव नं. | Present Members & Resolution हजर सभासद व ठराव | Remarks शेरा |
|---|---|---|
| | प्रमाणे कार्यान्वयात यावे. असे सांगून सदरचा विषय संपवला. | |
| | विषय क्र. ६ : संस्थेच्या निवडणूक कालावधिमध्ये निवडणूकीसाठी व इतर बाबींसाठी झालेल्या खर्चाला मान्यता देणेबाबत — | |
| | याबाबत सांगत असताना अध्यक्षांनी सर्वांना असे सांगितले कि, संस्थेच्या निवडणूकीचा कालावधि संस्थेचे निवडणूकी साठी उभे राहिलेले एक सदस्य श्री दाजी कृष्णा शिंझूरे यांचे अकाली निधन झाल्यामुळे लांबला गेलेला आहे त्यामुळे निवडणूक जाहिर झाल्यापासून वर जवळजवळ दोन महिन्यापेक्षा जास्त कालावधि गेलेला असल्यामुळे या कालावधिमध्ये संस्थेच्या कार्यालयाचे मासिक भाडे दोन महिन्याचे तसेच स्वीपरचे दोन महिन्याचे वेतन, इलेक्ट्रीक बिल व कार्यालयीन सहाय्यकाचा दोन महिन्याचा पगार इत्यादि खर्च करण्यात आलेले आहेत | |
| | त्याचप्रमाणे इलेक्शन (संस्थेची निवडणूक घेण्यासाठी) खर्च म्हणून इलेक्शन अधिकारी श्री संजय वाळंज यांना ~~क~~ दहा हजार + पाच हजार असे एकूण १५०००/- रुपये (पंधरा हजाराचे पेमेंट धनादेशाव्दारे देण्यात आलेले आहे. | |
| | वरिल सर्व बाबींच्या खर्चाला मान्यता देवून सदर विषय समाप्त केला. | |
| | विषय: ०७. संस्थेच्या पुनर्विकासाच्या संस्थेच्या कार्यक्रमाबाबत विचार-विनिमय करून मागिल विशेष | |

Meeting No. / सभा नं. 01-2022-27

Date / तारीख 26/06/2022

| Resolution No. / ठराव नं. | Present Members & Resolution / हजर सभासद व ठराव | Remarks / शेरा |
|---|---|---|
| | सर्वसाधारण सभेमध्ये घेतलेल्या निर्णयानुसार पुढील निर्णय घेण्याकरिता संस्थेच्या ~~विशे~~ विशेष सर्वसाधारण सभेची तारिख वेळ व स्थळ ठरविणेबाबत– | |
| | सदर विषयाबाबत अधिक माहिती देत असतांना सर्वांना असे सांगितले कि, आपली संस्था स्थापन होत असतांना मुख्य उद्देश संस्थेचा पुनर्विकास हा होता व तसा तो आजही आहे. आपण आपली या संदर्भातली मागिल सभा २९-०२-२०२० रोजी घेवून विकासकाकडून मागवायाच्या प्रस्तावामध्ये काही फेरबदल करून तो प्रस्ताव संस्थेच्या वतीने १४ दिवसांची पेपर नोटिस देण्याचे ठरले होते मात्र त्यानंतर कोविड महामारीने थैमान घातल्यामुळे व म्हाडाच्या धोरणामध्ये फेरफार आल्यामुळे जवळजवळ दोन तेसव्वा दोन वर्षे या ~~प्रस्तावर~~ प्रस्तावावर कोणत्याही प्रकारची कार्यवाही होवू शकलेली नाही. तर ती कार्यवाही यापूर्वीच करणे आवश्यक होते परंतू सहकार खात्याकडून संस्थाच्या निवडणुकीच्या कार्यक्रम निश्चित केला गेल्यामुळे यापूर्वी या कामाला सुरवात करू शकलो नाही आता मात्र या कामाला प्रथम प्राधान्य देवून त्याची सुरवात करावी लागेल तत्पूर्वी संस्थेच्या निवडणूकानंतर पहिली विशेष घटनात्मक सभा घेणे सुध्दा आवश्यक आहे त्यामुळे या दोन्ही विषयांवर चर्चा करून संस्थेच्या पुनर्विकासाला चालना देण्यासाठी सभासदांची परवानगी घेणे आवश्यक आहे | |
| | यावर संस्थेचे एक सदस्य श्री तरुण छाब्रा यांनी असे सांगितले कि या दोन वर्षांमध्ये संस्थेचे सर्व सभासद पुर्नविकासाच्या प्रस्तावातील मजकूर विसरुन गेले असतील म्हणून त्यांना आठवण करुन देण्यासाठी मागिल विशेष | |

सिध्दी सिध्दी ... नोंदणी क्र. मु./म्हाडा/गृ/(टी सी) १३०६६/२०११-१२ ... नगर, मुंबई-

# Managing Committee Minute Book
## कार्यकारी मंडळाचे मिनिट बुक



Meeting No. सभा नं. 01 - 2022-27

Date तारीख 26/06/2022

| Resolution No. ठराव नं. | Present Members & Resolution हजर सभासद व ठराव | Remarks शेरा |
|---|---|---|
| | शुल्क भर नहि रहे है और प्रलंबित शुल्क बहुत हो गया है उसके अन्य उपर ब्याज भी लग रहा है। उसके के लिये कुछ सुविधा सभासदो को देना जरुरी है उस हिसाब से अगर सुविधा देंगे तो सभासद अपना बकाया रक्कम सोसायटी के पास जमा करेंगे. | |
| | यावर संस्थेच्या अध्यक्षांनी असे सांगितले कि, सदर विषयी निर्णय घेण्याचा अधिकार संस्थेच्या सर्व साधारण सभेला आहे त्यामुळे याबाबत येणाऱ्या सर्वसाधारण सभेमध्ये निर्णय घेऊन सदरचा विषय मार्गी लावावा असे ठरले. | |
| | यानंतर संस्थेच्या पुर्नविकासाबाबत सर्व कामे पार पाडण्यासाठी संस्थेकडून संस्थेच्या व्यवस्थापक समितिला संस्थेच्या वतीने पुर्नविकाससंबंधी बाकी असलेली सर्व कामे करणे तसेच संस्थेच्या विशेष सर्वसाधारण सभेने घेतलेले निर्णयांची अंमलबजावणी करण्यासाठी तसेच सर्वसाधारण सभेमध्ये घेतलेले निर्णय मार्गी लावण्यासाठी संस्थेकडून संस्थेच्या पदाधिकाऱ्यांना अधिकार देण्याबाबतचा ठराव घेण्याबाबतचा विषय विषय-पत्रिकेमध्ये ठेवणेबाबत. | |
| | त्याचप्रमाणे पुर्नविकासाचे प्रस्ताव विकासकांकडून माग-विण्यात येण्यापूर्वी किंवा त्या प्रस्तावाची जाहिरात न्यूज पेपर मध्ये देण्यापूर्वी ते प्रस्तावाचा कच्चा ड्राफ्ट बनवून तो आगामी विशेष सर्वसाधारण सभेमध्ये मंजुरी साठी ठेवावा व त्यानंतरच त्याबाबची जाहिरात वृत्तपत्रामध्ये द्यावी. | |
| | त्यानंतर असाहि निर्णय घेण्यात आला कि, पुर्नविकासाबाबत पुढील वेळापत्रक कसे असेल पूर्न- | |

# Managing Committee Minute Book
# कार्यकारी मंडळाचे मिनिट बुक

**Meeting No.** सभा नं. 01 - 2022-27

**Date** तारीख 26/06/2022

| Resolution No. ठराव नं. | Present Members & Resolution हजर सभासद व ठराव | Remarks शेरा |
| --- | --- | --- |
| | विकासाबाबत नियम ७९-A अंतर्गत पुढील कार्यक्रम कसा असेल याबाबतची सूक्ष्मपूर्ण कार्यपध्दती सर्व सभासदाना समजून सांगावी असे ठरले.<br>अशाप्रकारे पुढील विशेष सर्वसाधारण सभा घेण्या-साठी विषय पत्रिका बनविण्यात यावी व वर उल्लेख केलेल्या सर्व बाबींचा उल्लेख विषयपत्रिकेमध्ये करावा असे ठ सर्वानुमते ठरले त्यास सर्वांनी मान्यता दिली. व सदरचा विषय संपवला<br>त्यानंतर<br>विषय क्रं. १०<br>अध्यक्षांच्या परवानगीने आयत्या वेळी येणारे विषय<br>यविषयी संस्थेच्या सचिवांनी आपून कोणाला काही विषयांवर बोलावयाचे आहे का? याबाबतची विचारणा केली असता कोणीही आपून काही विषय असल्याबाबत सांगितले नाही.<br>म्हणून सचिवांनी आजची सभा समाप्त हे करत असल्याचे सांगून उपस्थित सर्वांचे आभार मानले व सभा संपल्याचे जाहिर केले. | |

ओशिवरा रिध्दी सिध्दी स.गृ.सं.(म.)

अध्यक्ष

सचिव